महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**स्मरणपत्र :**
**अतितात्काळ :**
**कालमर्यादा दि.२५/०२/२०२१**

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/वृक्षलागवड/२०२१/८८०
दिनांक : 24 FEB 2021

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका
तसेच व्यावसायिकअभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
**(पुणे विभाग पुणे)**

**विषय :- वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याबाबत.**
संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिकापु/विवि-१/वृक्षलागवड/२०२१/६९०, दि. ०९.०२.२०२१.
२) तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/३४-दि.०२.०२.२०२१.
३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक : रासेयो-२०२१/प्र.क्र.१३/साशि-७, दि.२९.०१.२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, वार्षिक कार्यक्रम सन २०२१-२२ आखणी संदर्भात मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभा यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत म. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभा यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड या माहिमेअंतर्गत तसेच अन्य वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांच्याकडून, त्या-त्या वर्षी कोणत्या ठिकाणी व किती वृक्ष लागवड करण्यात आली, त्यापैकी जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांची वर्षनिहाय संख्या किती आहे याबाबतच्या माहितीचा एकत्रित अहवाल संदर्भांकित शासन पत्रासोबतच्या नमून्यात भरुन संचालनालयास तात्काळ पाठविण्याविषयी या विभागीय कार्यालयास सूचित केलेले आहे.

सदर पत्रास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांच्या संस्थाप्रमुखांना या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत सन २०१५-१६ ते २०२०-२१ या वर्षात केलेल्या वृक्षलागवडी बाबतची **बिनचूक माहिती** शासनास सादर करावयाची असल्याने, आपल्या संस्थेची एकूण ०६ वर्षांची अचूक व वर्षनिहाय **(06 Entries)** माहिती सोबत **दिलेल्या लिंकवर गुगल फॉर्ममध्ये इंग्रजीत (English) भरुन सादर करण्याबाबत तसेच सदर माहितीची संस्थाप्रमुखांच्या स्वाक्षरीची प्रत संस्थेच्या मूळ पत्रासह गुणवत्ता यादी पडताळणीच्या वेळी** सादर करण्याबाबत वरील संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये आपणास सूचित केलेले आहे.

**परंतु अद्याप ब-याच संस्थांनी सदर विषयाची माहिती वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार दिलेल्या लिंकवर गुगल फार्ममध्ये इंग्रजीत (English) भरलेली नाही हे खेदाने नमूद करावे लागत आहे.** तरी या स्मरणपत्राव्दारे आपणास पुनःश्च सूचित करण्यात येते की सदर विषयाची बिनचूक माहिती शासनास सादर करावयाची असल्यामुळे, ती दिनांक २५.०२.२०२१ रोजी, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत भरण्यात यावी. ज्या संस्था याबाबतची अचूक माहिती सादर करणार नाहीत किंवा चुकीची अथवा खोटी माहिती सादर करतील अशा संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या गुणवत्ता याद्यांची पडताळणी केली जाणार नाही याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

२४/०२/२१
(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : संदर्भिय पत्राची छायांकित प्रत.

महाराष्ट्र शासन
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**अतितात्काळ :**
**कालमर्यादा दि.१२/०२/२०२१**

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/वृक्षलागवड/२०२१/ 690
दिनांक : 09 FEB 2021

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका
तसेच व्यावसायिकअभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
**(पुणे विभाग पुणे)**

**विषय :- वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याबाबत.**

संदर्भ : १) तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/३४ दि.०२.०२.२०२१.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक : रासेयो-२०२१/प्र.क्र.१३/साशि-५, दि.२९.०१.२०२१.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, वार्षिक कार्यक्रम सन २०२१-२२ आखणी संदर्भात मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभा यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत म. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभा यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड या माहिमेअंतर्गत तसेच अन्य वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांच्याकडून, त्या-त्या वर्षी कोणत्या ठिकाणी व किती वृक्ष लागवड करण्यात आली, त्यापैकी जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांची वर्षनिहाय संख्या किती आहे याबाबतच्या माहितीचा एकत्रित अहवाल संदर्भांकित शासन पत्रासोबतच्या नमून्यात भरुन संचालनालयास तात्काळ पाठविण्याविषयी या विभागीय कार्यालयास सूचित केलेले आहे.

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांच्या संस्थाप्रमुखांना या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत सन २०१५-१६ ते २०२०-२१ या वर्षात केलेल्या वृक्षलागवडी बाबतची **<u>बिनचूक माहिती</u>** शासनास सादर करावयाची असल्याने, आपल्या संस्थेची एकूण ०६ वर्षांची अचूक व वर्षनिहाय **(06 Entries)** माहिती सोबत **दिलेल्या लिंकवर <u>गुगल फॉर्ममध्ये</u> इंग्रजीत (English) भरुन सादर करण्यात यावी. तसेच सदर माहितीची संस्थाप्रमुखाच्या स्वाक्षरीची प्रत संस्थेच्या मूळ पत्रासह गुणवत्ता यादी पडताळणीच्या वेळी** या कार्यालयाच्या विद्यार्थी विभागात जमा करावी. ज्या संस्था याबाबतची चुकीची अथवा खोटी माहिती सादर केलेले आढळल्यास, अशा संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या गुणवत्ता याद्यांची पडताळणी केली जाणार नाही याची **सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : संदर्भिय पत्राची छायांकित प्रत.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597436,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०२१/३४      दिनांक : ०1०२1२०२१
**ईमेलव्दारे**

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : **वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याबाबत.**

**संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक रासेयो-२०२१/प्र.क्र.१३/साशि-७, दिनांक २९.१.२०२१**

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, वार्षिक कार्यक्रम सन २०२१-२२ आखणी संदर्भात मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड या मोहिमेअंतर्गत तसेच अन्य वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांच्याकडून त्या त्या वर्षी कोणत्या ठिकाणी व किती वृक्ष लागवड करण्यात आली, त्यापैकी जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांची वर्षनिहाय संख्या किती आहे, याबाबतच्या सविस्तर माहितीचा एकत्रित अहवाल संदर्भांकित शासनपत्रासोबतच्या नमुन्यात भरून या संचालनालयास तात्काळ पाठवावा, जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
04 FEB 2021
आवक क्र. 9068

(प्रमोद नाईक)
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

E/mansi/mansi/sankirn/sankirnLTR2020(march onwars)

# महाराष्ट्र शासन


<u>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.</u>

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, 3 महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५.


क्रमांक: रासेयो-२०२१/प्र.क्र.१३/साशि-७ दिनांक: २९.०१.२०२१.

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना / संचालनालये,
सर्व कृषी/अकृषी/अभिमत विद्यापीठे व +२ स्तर.

विषय : वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याबाबत...

संदर्भ : या विभागाचे प.क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६९/साशि-१,दि.२७/०१/२०२१.

वार्षिक कार्यक्रम सन २०२१-२२ आखणी संदर्भात मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार, महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड या मोहिमेअंतर्गत तसेच अन्य वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत उच्च व तंत्र विभागाने विविध स्तरावर केलेल्या वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाची माहिती व याअंतर्गत मागील ६ वर्षात केलेल्या वृक्ष लागवड व संवर्धनाचा सविस्तर आढावा घेण्याची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

त्यानुसार रासेयो अंतर्गत मागील ६ वर्षात विद्यापीठ/महाविद्यालयांकडून त्या-त्या वर्षी कोणत्या ठिकाणी व किती वृक्ष लागवड करण्यात आली, त्यापैकी जतन व संवर्धन केलेल्या वृक्षांची वर्षनिहाय संख्या किती आहे, याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या रासेयो विभागाने त्या त्याठिकाणच्या वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रमाची पाहणी करावी व तसा याबाबतचा एकत्रित अहवाल निर्दिष्टीत नमुन्यात शासनास सादर करावा.

(डॉ. प्रभाकर देसाई)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. कुलगुरु (सर्व विद्यापीठे)
२. मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. कुलसचिव (सर्व विद्यापीठे)

# वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रम अहवाल

## ( सन २०१५-१६ ते २०२०-२१ )

### विद्यापीठ/महाविद्यालये/परिसंस्था/उच्च व तंत्र शिक्षण संचालनालये व अंतर्गत सर्व कार्यालये

| अ.क्र. | वृक्ष लागवडीचे वर्ष | वृक्ष लागवडीची जागा (क्षेत्रफळ व ठिकाण) | वृक्षलागवड संख्या | जतन व संवर्धन वृक्ष संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | | | | |
| २ | २०१६-१७ | | | | |
| ३ | २०१७-१८ | | | | |
| ४ | २०१८-१९ | | | | |
| ५ | २०१९-२० | | | | |
| ६ | २०२०-२१ | | | | |